24-05-2025-Dai-03_DH_PAN_20_08_2016-3.qxp 23-05-2025 21:14 Page 1



## निवडक

### साखळी येथे आज ‘वन टू का फोर ’ नाटक

■ टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. २३** : ५० व्या गोवा ’ब’ गट मराठी राज्य नाट्यस्पर्धेतील तृतीय क्रमांक पारितोषिक विजेते आणि वैयक्तिक स्त्री व पुरुष अभिनय प्रमाणपत्र आणि प्रकाश योजनेचे प्रथम पारितोषिक प्राप्त –सातेरी कलामंदिर,हसापुर,गोवा प्रस्तुत व कै. सतीश तारे लिखीत दोन अंकी धम्माल विनोदी नाटक ‘वन टू का फोर’ उद्या शनिवार दि. २४ रोजी सायंकाळी ७.३० वाजता रवींद्र भवन साखळी येथील कै. मनोहरबुवा शिरगावकर रंगमंचावर सादर होईल,
सातेरी कलामंदिर हसापूर, गोवा प्रस्तुत या नाटकाचे दिग्दर्शन गोविंद नाईक यांनी केले.
सूत्रधार सुहास मळीक, असून पार्श्वसंगीत चैतन्य गवस यांचे नेपथ्य व प्रकाशयोजना सुंदर कान्बोटकर व उमेश कान्बोटकर, वेशभूषा –नीतेश नाईक यांची असून यात नीलेश नारायण नाईक, गोविंद नाईक, अरविंद नाईक, प्रजय मळीक, दिव्या शिरोडकर, गीताली मातोंडकर, मैथिली मराठे, सुहास मळीक, संकल्प नाईक, राजाराम मळीक यांच्या भूमिका आहेत. स्वागत प्रवेशिका प्रयोगा आधी रवींद्र भवन येथे उपलब्ध असतील. चोखंदळ नाट्यरसिकांनी नाट्यप्रयोगाचा आस्वाद घ्यावा, असे आहवान आयोजकांनी केले आहे.

### सावईवेरे येथे उद्या जागोर उत्सव

■ टीम दैनिक हेराल्ड

**सावईवेरे दि. २३** : सावईवेरे येथील जैताचो वांगडी सख्याहरी या संस्थेतर्फे कला आणि संस्कृती खाते गोवा सरकार यांच्या सहकार्याने कला उत्सव २०२५ अंतर्गत जागोर उत्सव आयोजित करण्यात आला आहे. हा महोत्सव रविवारी २५ मे रोजी संध्याकाळी ७ वा. सावईवेरे येथील ग्रामपंचायत वाचनालयाच्या सभागृहात होणार आहे.
या उत्सवाच्या उद्घाटन सोहळ्यास कृषी मंत्री रवी नाईक, कला व संस्कृती मंत्री गोविंद गावडे, सरपंच शोभा पेरणी, पंच सदस्य अक्षय नाईक, डॉ. समर्थ बोरकर, अब्दुल बशीर, सुशील मोरजकर आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. तरी सर्वांनी उपस्थित राहावे, असे आवाहन अध्यक्ष दिनेश नाईक यांनी केले आहे.

### बाणस्तारी पूल २५ रोजी वाहतूकीस बंद

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २३** : राष्ट्रीय महामार्ग– ४ अ वरील बाणस्तारी पूल रविवार दि. २५ रोजी सकाळी ६.३० ते ८.३० वाजेपर्यंत सर्व प्रकारच्या वाहतूकीसाठी बंद राहील. या काळात पूलाची पाहणी आणि डेक लेव्हल्सचे रिकॉर्डिंगचे काम हाती घेण्यात येणार आहे.

### संड्यू अ‍ॅप ट्रान्सफॉर्मरवर आज खंडित वीज पुरवठा

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २३** : संड्यू अ‍ॅप ट्रान्सफॉर्मरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने शनिवार दि. २४ रोजी सकाळी ९ ते दुपारी ३ वाजेपर्यंत आयसीआयसीआय बँकेसमोर, सनी स्टेशनरीसमोर आणि सभोवतालच्या भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.

### मांद्रे मतदारसंघातील रस्त्याबाबत ७ जूनला व्यापक बैठक

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. २३** : येथील चोपडे ते केरी एम डी आर १८ तसेच सगळे अंतर्गत रस्त्याचे भुमापन २५ मीटर करण्याचा फतवा जारी केलां होता,त्या विरोधात हरमल तसेच अन्य पंचायत क्षेत्रातील सरपंच ,पंच व ग्रामस्थांची नियोजित बैठक शनिवार दि. ७ रोजी संध्याकाळी ४.३० वाजता हरमल गणेशोत्सव सभागृहात होणार असल्याचे कळविले आहे.
काल हरमल व अन्य पंचायत क्षेत्रातील नागरिकांनी आमदार जीत आरोलकर यांच्या कार्यालयात भेट घेतली व नियोजित २५ मे च्या बैठकीचे आमंत्रण दिले.
दरम्यान,आमदार जीत आरोलकर गोव्याबाहेर असल्याने बैठक २५ ऐवजी ७ जूनला निश्चित केली आहे. या भेटीत गावात उद्भवणाऱ्या संभाव्य परिणामाची कल्पना दिली व स्थापित चरितार्थ व घरांची हानी करून मतदारसंघाचं विकास कदापिही सहन करणार नसल्याचे शिष्टमंडळाने सांगितले.आमदार जीत आरोलकर यांनी शिष्टमंडळाला सकारात्मक प्रतिसाद दिला व ग्रामस्थांच्या भूमिकेचे स्वागत केले.
संर्वजनिक बांधकाम खात्याच्या बेजबाबदार व अप्रामाणिक अधिजाऱ्यामुळे ही परिस्थिती उद्भवली असून नाहक जनता भरडली जाईल व लाखोंची नुकसानी होईल,त्यास जबाबदार कोण असा सवाल संतप्त ग्रामस्थानी केला आहे. या गावच्या विकासाची जनतेला आस आहे. मात्र जनतेची घरे, डारे मोडून विकास नको,असे ठणकावून सांगितले. दरम्यान, शनिवार ७ जून रोजी संध्याकाळी ४.३० वाजता ग्रामस्थानी आवर्जून उपस्थित राहावे असे आवाहन केले आहे.

# मडगावमधील जुन्या इमारतीचा भाग कोसळला

## ३ वाहनांचे नुकसान | जीवितहानी टळली :धोकादायक इमारती पाडणार कधी

■ टीम दैनिक हेराल्ड





**मडगाव, दि. २३** : शहरातील पिंपळ कट्टा परिसरात शुक्रवारी दुपारी एका जीर्ण अवस्थेतील जुन्या इमारतीचा काही भाग कोसळल्याची घटना घडली. या दुर्घटनेत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी पार्क केलेल्या तीन वाहनांचे नुकसान झाले आहे. या घटनेमुळे पुन्हा एकदा शहरातील असुरक्षित इमारतींच्या स्थितीबाबत चिंता व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कोसळलेली इमारत मडगाव नगर परिषदेने यापूर्वीच असुरक्षित म्हणून घोषित केली होती. इमारतीच्या भिंतींना तडे जाणे, गंजलेली लोखंडी सळई यांसारख्या धोकादायक चिन्हांमुळे ही इमारत धोकादायक घोषित करण्यात आली होती. यापूर्वीही याच परिसरात अशाच स्वरूपाची दुर्घटना घडली होती, परंतु तातडीने ठोस उपाययोजना झाल्याचे दिसून आले नाही.

या घटनेनंतर मडगाव अग्निशमन व आपत्कालीन सेवांनी त्वरित घटनास्थळी धाव घेऊन ढिगारा हटवण्याचे आणि परिसर सुरक्षित करण्याचे काम हाती घेतले. नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने संबंधित परिसराला अडथळे उभे करून प्रवेश बंद करण्यात आला आहे.

या घटनेनंतर मडगावचे आमदार दिगंबर कामत यांनी घटनास्थळी भेट देत नगर परिषदेच्या अधिकाऱ्यांना तातडीने स्वच्छता व सुरक्षा उपाययोजना करण्याचे निर्देश दिले.

याबाबत बोलताना आमदार कामत म्हणाले की, मी मडगाव नगर परिषदेच्या अधिकाऱ्यांना त्वरित कार्यवाही करण्यास सांगितले आहे. कोणत्याही प्रकारची जीवितहानी किंवा मालमत्तेचे नुकसान टाळण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घेतली जाईल. त्यांनी या इमारतीत सुरू असलेल्या व्यावसायिक आस्थापनांच्या मालकांना जागा रिकामी करण्याचा सल्ला दिला.

सार्वजनिक सुरक्षेशी कोणतीही तडजोड करता येणार नाही. इमारती सुरक्षित असल्याची खात्री होईपर्यंत दुकानदारांनी स्थलांतरित व्हावे, असे ते म्हणाले. या दुर्घटनेबद्दल परिसरातील नागरिक आणि व्यावसायिकांनीही नाराजी व्यक्त केली. या परिसरात कायम गर्दी असते. अशी घटना एखाद्या वर्दळीच्या वेळी घडली असती, तर मोठा अनर्थ घडू शकला असता, असे एका स्थानिक दुकान मालकाने सांगितले.

या घटनेनंतर मडगाव नगर परिषदेच्या निष्क्रीयतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, रहिवाशांनी असुरक्षित इमारतींच्या तपासणीसाठी तातडीने मोहीम राबविण्याची मागणी केली आहे. विशेषतः पावसाळ्यापूर्वी ही कारवाई अत्यावश्यक असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

> याच इमारतीत यापूर्वीही अशीच एक दुर्घटना घडली होती. त्यानंतर मडगाव नगरपरिषदेकडून संरचनात्मक स्थिरतेचा अहवाल मागवण्यात आला होता आणि असुरक्षित इमारतींना पाडण्याच्या नोटिसा बजावण्यात आल्या होत्या. मात्र, प्रत्यक्षात कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. धक्कादायक बाब म्हणजे, स्थानिक आमदार स्वतः अशाच एका धोकादायक इमारतीत व्यावसायिक उद्घाटन करताना दिसले.
> **- साव्हियो कुतिन्हो** (माजी नगराध्यक्ष)

> मडगाव मार्केटच्या मध्यवर्ती भागातील इमारतीचा कोसळलेला भाग हा स्पष्ट इशारा आहे. या घटनेमुळे अंतर्गत रस्ता बंद करावा लागला आहे. आधीच पॉवर हाऊस ते रावणफोंड दरम्यानचा रस्ता बंद असल्यामुळे नागरिकांना होणाऱ्या गैरसोयींमध्ये अधिक भर पडली आहे. अधिकाऱ्यांच्या बेजबाबदारपणामुळे निष्पाप मडगावकरांना त्रास सहन करावा लागत आहे.
> **- प्रभाव नाईक** (सामाजिक कार्यकर्ते)

दरम्यान, महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट दिली असून, संबंधित इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट त्वरित करण्यात येईल, तसेच इतर धोकादायक इमारतींवर कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन दिले आहे.

# साळ प्रदूषणाचा केळशी किनारपट्टीला फटका

■ टीम दैनिक हेराल्ड





**मडगाव, दि. २३** : दोन दिवसांच्या मुसळधार पावसामुळे साळ नदीतून मोठ्या प्रमाणात मृत मासे आणि जलचर तसेच कचरा केळशी मोबोर किनारपट्टीवर वाहून आल्याने स्थानिक आणि पर्यटकांमध्ये गंभीर चिंता निर्माण झाली आहे.नागरिकांनी या परिस्थितीला पर्यावरणीय आणीबाणी म्हणून घोषित करण्याची मागणी केली आहे.

कुजलेले मासे आणि कुजलेल्या जलचर वनस्पतींमुळे किनारपट्टीवर अतिशय दुर्गंधी निर्माण झाली आहे आणि गंभीर प्रदूषणाची चिंता निर्माण झाली आहे. जर परिस्थिती लवकरात लवकर आटोक्यात आणली गेली नाही तर संभाव्य पर्यावरणीय दुष्परिणामांची भीती वाढत आहे.

याबाबत केळशी सरपंच डिक्सन वाझ यांनी राज्य सरकार आणि संबंधित पर्यावरण अधिकाऱ्यांना हस्तक्षेप करून तात्काळ स्वच्छता मोहीम राबवण्याचे आवाहन केले आहे. त्यांनी इशारा दिला आहे की जर कोणतीही कारवाई केली नाही तर ही समस्या वाढू शकते, ज्यामुळे स्थानिक परिसंस्थेचे आणि परिसरातील महत्त्वाच्या पर्यटन अर्थव्यवस्थेचे आरोग्य धोक्यात येऊ शकते.

ही केवळ गैरसोयीची बाब नाही; ही एक पर्यावरणीय आणीबाणी आहे, असे सांगून वाझ म्हणाले की , आपल्या समुद्रकिनारे आणि जलमार्गांचा आणखी ऱ्हास रोखण्यासाठी आपल्याला तातडीने हस्तक्षेप करण्याची आवश्यकता आहे. साळ नदीचे पाणी ठिकठिकाणी अडले गेलेआहे आणि आता प्रदूषण आपल्या किनाऱ्यावर पोहोचत आहे.

स्थानिकांचा असा आरोप आहे की ही घटना खराब कचरा व्यवस्थापन पद्धती आणि नदीच्या अपुरी देखभालीशी संबंधित आहे, ज्यामुळे प्रदूषक आणि जलचर सारख्या आक्रमक वनस्पती प्रजाती नदीत जमा होऊ लागल्या आहेत. अचानक झालेल्या पावसामुळे हे पदार्थ समुद्रात सोडले गेले आणि अखेर भरती–ओहोटीसह ते पुन्हा समुद्रकिनाऱ्यावर ढकलले गेले.

पर्यटनावर अवलंबून असलेली केळशी – मोबोर किनारपट्टी, जी त्याच्या शुद्ध वाळू आणि उच्च दर्जाच्या रिसॉर्ट्र्ससाठी ओळखली जाते, ती आता पर्यावरणीय स्वच्छता आणि सार्वजनिक धारणा व्यवस्थापित करण्याच्या दुहेरी आव्हानांना तोंड देत आहे.

पर्यावरणप्रेमी आणि रहिवासी सरकारला या घटनेला जागृतीचा इशारा मानून नदीतील गाळ काढणे, नियमित देखरेख आणि पुनरावृत्ती टाळण्यासाठी चांगल्या कचरा विल्हेवाट प्रणाली यासारखे दीर्घकालीन उपाय अंमलात आणण्याची विनंती करत आहेत.

# स्मार्ट हेल्मेट व रिस्ट बॅन्ड व्यावसायिक वापरासाठी नाही

■ टीम दैनिक हेराल्ड

▶ वीज विभागाचे स्पष्टीकरण

▶ सुधारणा आवश्यक

**पणजी, दि. २३** : गोवा अभियांत्रिकी महाविद्यालय, फर्मागुडी येथील विद्यार्थ्यांनी विकसित केलेले स्मार्ट हेल्मेट आणि मनगटी घड्याळ ही उपकरणे केवळ शैक्षणिक प्रकल्प आहेत व त्यांचा व्यावसायिक वापर करता येणार नाही, अशी स्पष्टोक्ती वीज विभागाने दिली आहे.

ही उपकरणे विद्युत सुरक्षा लक्षात घेऊन डिझाइन करण्यात आली असून, यामध्ये विशेषत: लाईनमनसाठी उपयोगी ठरणारे तंत्रज्ञान वापरण्यात आले आहे. गोवा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्युत अभियांत्रिकी विभागातील सहयोगी प्राध्यापक जयेश प्रियोळकर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी ही साधने तयार केली आहेत. जीईसीच्या प्रयोगशाळेत ट्रान्सफॉर्मर आणि उच्च–दाब विद्युतप्रवाहासोबत त्यांच्या कार्यक्षमतेची यशस्वी चाचणी देखील झाली होती. लाईनमन वायरजवळ गेल्यास ’बीप’ सिग्नलद्वारे सतर्क करणारी यंत्रणा या स्मार्ट हेल्मेटमध्ये बसवण्यात आली होती. ही उपकरणे मागील वर्षी सप्टेंबरमध्ये महाविद्यालयात आयोजित दोन दिवसीय इलेक्ट्रिकल फायर सेफ्टी’ प्रशिक्षण कार्यशाळेच्या शेवटी प्रदर्शित करण्यात आली होती.

ऊर्जा मंत्री ढवळीकर यांनीही विद्यार्थ्यांना अशा उपकरणांच्या विकासासाठी प्रेरित केले होते, विशेषतः लाईनमनच्या अपघाती मृत्यूच्या पार्श्वभूमीवर. मंत्री ढवळीकर यांनी त्या वेळी म्हटले होते की, अशा उपकरणांमुळे कामाच्या ठिकाणी जीवितहानी टाळता येऊ शकते.

मात्र, गेल्या मंगळवारी होंडा येथे एका लाईनमनचा विजेचा धक्का लागून मृत्यू झाल्यानंतर या उपकरणांचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला. अनेकांनी सरकारने ही उपकरणे प्रत्यक्ष वापरात का आणली नाहीत, असा प्रश्न उपस्थित केला.

या पार्श्वभूमीवर बोलताना वीज विभागाचे अधीक्षक अभियंता (नियोजन) मयूर हेडे यांनी स्पष्ट केले की, ही उपकरणे सध्या केवळ शैक्षणिक प्रकल्प आहेत. हे कोणत्याही प्रमाणित तांत्रिक निकषांवर आधारित व्यावसायिक उपकरण नाही. मी हे जीईसी मधील संबंधित प्राध्यापकांना पूर्वीच कळवले आहे की या यंत्रणांमध्ये अजून सुधारणा करणे आवश्यक आहे.

# खासदार फर्नांडिस यांची मायकल लोबोंवर टीकेची तोफ

■ टीम दैनिक हेराल्ड

**कळंगुट, दि. २३ :** ज्याने देवाला दिलेले वचन पाळले नाही, तो जनतेशी निष्ठावान राहील अशी अपेक्षा करता येत नाही, अशा शब्दांत दक्षिण गोव्याचे काँग्रेस खासदार विरियातो फर्नांडिस यांनी कळंगुटचे आमदार मायकल लोबो यांच्यावर जोरदार टीका केली आहे.

कळंगुट येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना फर्नांडिस म्हणाले की, लोबो यांच्याकडे कोणतीही तत्वनिष्ठा किंवा नैतिक मूल्ये उरलेली नाहीत. निवडणुकीपूर्वी मंदिरे आणि चर्चमध्ये शपथ घेणाऱ्या आमदारांनी सत्तेसाठी भाजपमध्ये प्रवेश केला. ही जनतेशी केलेली सरळसरळ फसवणूक आहे, असा आरोप त्यांनी केला.

हणजूण येथे सुरू असलेल्या अनधिकृत बांधकामांवरील कारवाईबाबत फर्नांडिस म्हणाले की, पाच वर्षांसाठी निवडून आलेले आमदार जनतेसाठी कार्य करतील, हीच अपेक्षा असते. मात्र, सध्या सत्ताधाऱ्यांचा उद्देश केवळ स्वतःचा फायदा करून घेणे, जनतेची फसवणूक करणे आणि भ्रष्ट मार्गांनी संपत्ती कमावणे असा दिसतो. जनता लवकरच याला जोरदार उत्तर देईल.

फर्नांडिस यांनी आरोप केला की, गेल्या निवडणुकीपूर्वी लोबो आणि त्यांच्या पत्नी, ज्या सध्या शिवोलीच्या आमदार आहेत. सरकारने त्यांच्या हॉटेलवर कारवाई केल्याचा गहजब करत होते. पण आता हेच लोक स्थानिकांच्या घरे पाडताना शांत आहेत. ही दांभिक भूमिका आहे.

भाजप सरकारच्या पर्यटन धोरणावर टीका करताना फर्नांडिस म्हणाले की, गोव्यातील किनाऱ्यांवरील स्थानिक झोपड्यांना प्रचंड कर लादण्यात आले आहेत. त्यामुळे स्थानिक उद्योजकांवर तगडा आर्थिक बोजा पडला असून, बाहेरील लोकांना झोपड्या चालवण्याची मुभा दिली जात आहे. हे धोरण गोव्याच्या पारंपरिक पर्यटन क्षेत्राला हानी पोहोचवणारे आहे.

कळंगुट परिसराच्या सध्याच्या स्थितीवर भाष्य करताना फर्नांडिस म्हणाले, कळंगुट हे एकेकाळी जागतिक स्तरावर प्रसिद्ध पर्यटन स्थळ होते. परंतु सध्याच्या नेतृत्वामुळे त्याचे रूपांतर वेश्याव्यवसायाचे केंद्र, अस्वच्छ व बेभरवशाचे ठिकाण झाले आहे. ही परिस्थिती बदलण्यासाठी नेतृत्व परिवर्तन आवश्यक आहे.

या दौऱ्याचे उद्दिष्ट सांगताना फर्नांडिस म्हणाले की, कळंगुटमधील काँग्रेस पक्ष पुन्हा बळकट करणे हेच या दौऱ्यामागचे मुख्य कारण आहे. स्थानिक नेतृत्वात बदल झाल्यास कळंगुटचा हरवलेला गौरव पुन्हा प्राप्त होईल आणि भावी पिढ्यांना अभिमान वाटेल की ते कळंगुटचे रहिवासी आहेत.

